**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**पाच वर्षाचा बृहत आराखडा तयार करण्यासाठी विद्यापीठात १८ मे रोजी कार्यशाळेचे आयोजन**
**आमंत्रित हिततुल्य घटकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदीनुसार विद्यापीठाचा २०१९ ते २०२४ या कालावधीचा पाच वर्षाचा बृहत आराखडा तयार करावयाचा आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाच्यावतीने दृकश्राव्य सभागृहात दि. १८ मे, २०१८ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेला शासनाचे प्रतिनिधी सुद्धा उपस्थित राहणार आहेत.

सकाळी ९.०० ते १०.०० नोंदणी, १०.०० ते १०.३० उद्घाटन सत्र, १०.३० ते ११.३० तांत्रिक सत्र ज्यामध्ये 'रोडमॅप फॉर डेव्हलपींग पर्स्पेक्टिव्ह प्लॅन विथ रेफ्रन्स टू एम.पी.यु. ॲक्ट २०१६ ॲण्ड डॉ. नरेंद्र जाधव कमिटी रिपोर्ट' या विषयावर मार्गदर्शन होईल. दुपारच्या तांत्रिक सत्रात 'पेडॅगॉगी ऑफ पर्स्पेक्टिव्ह प्लॅन : डायमेन्शन गाईडिंग प्रिन्सीपल्स ॲण्ड एलिमेन्टस् ऑफ पर्स्पेक्टिव्ह प्लॅन' या विषयावर; त्यानंतर चर्चेसाठी खुले सत्र असणार आहे. तिसरे तांत्रिक सत्र 'प्रोफॉर्मा ॲण्ड टेम्प्लेटस् अलॉंग विथ वर्किंग प्लॅन' या विषयावर संपन्न होईल, त्यानंतर खुले सत्र व समारोप होईल.

कार्यशाळेत सर्वांचा सहभाग असावा आणि सविस्तर चर्चा व त्या माध्यमातून विचारमंथन होवून सर्व समावेशक बृहत आराखडा तयार व्हावा, त्यादृष्टीने कार्यशाळेत विद्यापीठाशी संबंधित हिततुल्य घटकांनी सहभागी होवून विद्यापीठाला सर्व समावेशक बृहत आराखडा तयार करण्यासाठी सहकार्य करावे आणि कार्यशाळेला सर्व आमंत्रित हिततुल्य घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १५/०५/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी